**Publication: Global times**
**Date: 19.10.2025**

# एच. टी. पारेख फाउंडेशन आणि सेंट ज्यूड्स इंडियाकडून बालकर्करोगग्रस्तांसाठी पाच नवीन केंद्रांचे उद्‌घाटन

मुंबई : बालकर्करोगाशी झुंज देणाऱ्या कुटुंबांना सर्वांगीण मदत पुरविण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल म्हणून, एच. टी. पारेख फाउंडेशन आणि सेंट ज्यूड इंडिया चाइल्डकेअर सेंटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबईत पाच अत्याधुनिक निवासी केंद्रांचे आज उद्‌घाटन करण्यात आले. टाटा मेमोरियल सेंटरच्या 'अॅडव्हान्स्ड सेंटर फॉर ट्रीटमेंट, रिसर्च अँड एज्युकेशन इन कॅन्सर' या संकुलात उभारण्यात आलेली ही केंद्रे दुर्बल कुटुंबांना सुरक्षित व सन्मानजनक आधार देण्याच्या दिशेने मोठी झेप ठरली आहे. या उद्‌घाटन सोहळ्याला एच. टी. पारेख फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक एस. पारेख, सेंट ज्यूड्स इंडियाच्या अध्यक्षा मनीषा पार्थसारथी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नायर उपस्थित होते. दोन्ही संस्थांच्या टीम सदस्यांनीही या प्रसंगी सहभाग घेतला.

या पाच नव्या केंद्रांपैकी दोन केंद्रे केवळ अस्थिमज्जा प्रत्यारोपण रुग्णांसाठी राखीव असतील.

या सर्व केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १३० कुटुंबांना मोफत, स्वच्छ आणि सुरक्षित निवासाची सोय उपलब्ध करून दिली जाईल. निवासाबरोबरच पोषक आहार, समुपदेशन, शैक्षणिक सहाय्य आणि प्रवासाची सोयही पुरवली जाणार आहे. या सर्व सुविधांमुळे उपचार घेत असलेल्या मुलांसाठी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी हे खऱ्या अर्थाने "घरापासून दूर, पण आपलेसे घर" ठरेल.

रुग्णकेंद्री उपक्रमांना बळकटी देण्यासाठी एच. टी. पारेख फाउंडेशनने एसीटीआरईसी केंद्रात आणखी काही मूलभूत सुविधा उभारल्या आहेत.

त्यात तीन नव्या लिफ्ट्सची बसवणूक, पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन प्रणाली, कंपोस्टिंग युनिट्स आणि इमारतीच्या हिरवाई क्षेत्राचा काही भाग विकसित करण्यासाठी निधीचा समावेश आहे. या उपक्रमांमधून प्रत्येक कुटुंबाच्या सन्मान व सोयीसाठी दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय उपलब्ध करून देण्याच्या फाउंडेशनच्या ध्येयाची पुष्टी होते. ही पाच केंद्रे सेंट ज्यूड्सच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या प्रकल्पाचा एक भाग आहेत. १२ मजली आणि २३४ युनिट्स असलेले हे विशाल संकुल पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यावर दरवर्षी सुमारे ७०० कुटुंबांना मोफत निवास उपलब्ध करून देईल. पुढील वीस वर्षांत या सुविधेचा लाभ सुमारे ३५ हजार व्यक्तींना होण्याचा अंदाज आहे.

एच. टी. पारेख फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी झिया लालकाका यांनी सांगितले, "सेंट ज्यूड्ससोबतचा आमचा संबंध दशकभरापूर्वी सुरू झाला. आम्ही त्यांचे देशभरातील विविध केंद्रांचे संचालन समर्थित केले आणि नंतर मुंबईतील कॉटन ग्रीन येथील केंद्राला सहाय्य केले. आता खारघर येथील त्यांच्या सर्वात मोठ्या संकुलाच्या उद्‌घाटनाच्या प्रसंगी त्यांच्यासोबत उभे राहणे आमच्यासाठी अभिमानास्पद आहे. सेंट ज्यूड्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नायर म्हणाले, "कर्करोग उपचारासाठी मोठ्या शहरांत येणाऱ्या कुटुंबांसाठी सेंट ज्यूड्स हे फक्त निवासस्थान नाही, तर एक आश्रयस्थान आहे.